MAHBIL03429/13/1/2000-TC

खाजगी वितरणासाठी

वर्ष: आठवे । अंक: दूसरा । जून, २००८

# CIDCO Nirmiti

A NEWSLETTER



02 'Vastu Vihar' & 'Celebration' – Bhoomi pujan performed


04 उल्लेखनीय कामगिरी करणारे सिडको कर्मचारी सन्मानित


08 Corporate Branding


09 सिडकोच्या 'वास्तुविहार' व 'सेलिब्रेशन' गृहयोजनेच्या नोंदणीस उत्तम प्रतिसाद


## सिडको कार्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ४८वा वर्धापन दिन सिडकोच्या नवी मुंबई येथील मुख्य कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** यांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आले. सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दीपक कपूर** यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. सदर प्रसंगी सिडको आर्टिस्ट कंबाईनने राष्ट्रगीत प्रस्तुत केले. सुरक्षा रक्षक व अग्निशमन दलाने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन औरंगाबाद येथील उद्योग भवन, सिडको कार्यालयातही महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. मुख्य प्रशासक, नवीन शहरे **श्री. मनोहर भगत** यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर वाळुज महानगर येथील कार्यालयात प्रभारी प्रशासक व कार्यकारी अभियंता श्री. ए.बी. पवार यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी सिडकोचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.









# साडेबारा टक्के भूखंड वाटप योजना
# तळोजा, रोडपाली व उलवे येथील संगणकीय सोडत सिडको संचालक मंडळासमक्ष संपन्न





नवी मुंबईच्या तळोजा, रोडपाली व उलवे येथील भूमीपुत्रांसाठी १२.५ टक्के योजने अंतर्गत काढण्यात येणारी भूखंड वाटपाची संगणकीय सोडत सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. नकुल पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली सिडको संचालक मंडळासमक्ष बुधवार, दि. ७ मे, २००८ रोजी 'निर्मल', नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१ येथे पार पडली.

या सोडतीद्वारे ९.१४१ हेक्टर क्षेत्राचे वाटप प्रकल्पग्रस्तांना करण्यात आले. या अंतर्गत तळोजा, रोडपाली व उलवे येथील १३२ भूखंडांचे वाटप करण्यात आले.

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी १२.५ टक्के योजने अंतर्गत भूखंड वाटपाच्या संगणकीय सोडती संचालक मंडळासमक्ष काढण्याच्या कृतिशील कार्यवाहीत आतापर्यंत उलवे - ६१.११ हेक्टर, करंजाडे - १०.१६ हेक्टर, द्रोणागिरी - ३८.४९ हेक्टर, उलवे - २.११ हेक्टर, करंजाडे - १०.९७ हेक्टर, द्रोणागिरी - ७.३७ हेक्टर, तळोजा-पाचनंद - २९.८६ हेक्टर, नावडे२ - २.५४ हेक्टर, काळुंद्रे - ०.९७ हेक्टर, उलवे १डी - २१.९२ हेक्टर, उलवे १डी - १३.०९५ हेक्टर, द्रोणागिरी - ९.४६२ हेक्टर, तळोजा - १.६४२ हेक्टर, तळोजा ०.५०१, करंजाडे - १.४२ हेक्टर, कामोठे-२ - ०.४६६ व करंजाडे-२.०२ अशा एकूण २१४.१०६ हेक्टर क्षेत्राचे वाटप करण्यात आले. तळोजा, रोडपाली व उलवे येथील सोडतीतील ९.१४१ हेक्टर एवढ्या क्षेत्राचा समावेश धरुन आतापर्यंत या संगणकीय सोडतीद्वारे २२३.२४७ हेक्टर एवढ्या क्षेत्रासाठी संचालक मंडळासमोर सोडती काढण्यात आल्या आहेत.

या संगणकीय सोडतीला **मा. श्री. नकुल पाटील**, अध्यक्ष, सिडको, **श्री. जी. एस. गिल्ल**, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको व **श्री. दीपक कपूर**, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको हे उपस्थित होते.

# 'Vastu Vihar' & 'Celebration' – Bhoomi pujan performed



The ground breaking ceremony (Bhoomi Poojan) for the mass housing project of 'Vastuvihar' and 'Celebration' was done on 8th May 2008 at the hands of Shri A.S. Patil – ACE(II). Also present on the occasion were Shri K.K. Verhkedkar – SE, Shri B.K. Shami – SE, Shri J.R. Nayak – SE(Elect.), Shri S.A. Nadgauda – EE, Shri A.K. Verma – EE, Shri S.R. Kasare – EE(Elect.) and other Engineers from CIDCO. Shri V.G. Jana – Sr. Chief Executive, Shri Shiveshwarkar – Chief Executive, Shri Kudale – Dy. Chief Executive and Shri S.N. Shrikhande – Project Manager were



present on behalf of the contractors M/ s. B.G. Shirke CTPL.

**Shri G.S. Gill** – VC & MD, CIDCO reviewed the progress at site on 23rd May 2008. He was welcomed by Shri Shiveshwarkar – Chief Executive of M/ s. B.G. Shirke CTPL. VC & MD went around the site and inspected first-hand the Siporex solid blocks and Siporex pre-cast slabs used in the construction. This innovative technology is being used in CIDCO for the first time.



Shri A.S. Patil - ACE(II), Shri K.K. Verkhedkar – SE, Shri B.K. Shami – SE, Shri S.R. Kasare – EE(Elect.), Shri S.A. Nadgauda - EE, Shri A.K. Verma – EE, Mrs. Auti – Sr. Architect & Mrs. Rekha Dhar – Asso. Architect accompanied the VC & MD during the inspection and the discussions.

Vastu Vihar (KH-1 & KH-2) type tenements are to be completed within 21 months while KH-3 & KH-4 type tenements are to be completed within 24 months. The project cost of Vastuvihar is 61.94 crore & of Celebration is 135.81 crore.







## Golf Course at Kharghar - Bhoomi Pujan performed



The picturesque Kharghar Township, would soon have its own 18 hole international standard Golf course. Set in the back drop of the Panaromic Kharghar hills, the golf course is conceptualized over an area of 103 Ha. In addition it shall also house a country club house, golf academy and residential complexes within.

On 6th May 2008, the project got of to an auspicious beginning, with Bhoomi Pujan being performed at the hands of Shri S.C. Deshpande, CE&GM(T). Others present on the occasion were Shri D.V. Shekdar – CAP, Shri B.K. Shami



– SE, Mrs. Aparna Vedula – Sr. Planner, Shri R.J. Giri – EE, Shri Hartalkar – EE, Shri P.R. Natesh – EE and Brig. (Retd.) Shri Dilip Gole – President of ACE Golf Foundation.

The work of bulk earth work and rough shaping for the golf course costing Rs.9.11 crores has recently been awarded to M/s. Dongarai Construction Co. The Golf course is expected to be ready by April 2010.

Later on 23rd May 2008, VC & MD, **Shri. G. S. Gill** visited the site for reviewing the progress of work. Present along with him were Shri A.S. Patil – ACE(II), Shri K.K. Verkhedkar – SE, Shri B.K. Shami – SE, Shri R.J. Giri – EE, Shri D.M. Bokade – AEE and Shri Vasule – AE and the contractor's engineers.

## उल्लेखनीय कामगिरी करणारे सिडको कर्मचारी सन्मानित



सिडकोने प्रथमच गृहनिर्माण योजनेतील घरांची विक्री 'बुक बिल्डींग' या अभिनव 'दर निश्चिती' पद्धतीने केली. स्थावर मालमत्ता व्यवहारात या प्रकारच्या प्रक्रियेद्वारे अंमलबजावणी पहिल्यांदा करण्याचा मान सिडकोने मिळवला आणि या नव्या पद्धतीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नेरुळ येथील सीवूड्स इस्टेट, फेज-२, भाग-२ या सिडकोच्या महत्त्वाकांक्षी गृहनिर्माण योजनेला जनतेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ही योजना यशस्वी करण्यासाठी ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परीश्रम घेतले, त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करावा याबाबत संचालक मंडळाने निर्णय घेऊन दि. ७ मे, २००८ च्या संचालक मंडळाच्या बैठकीत प्रमुख भूमिका बजावणाऱ्या अधिकाऱ्यांचा सिडकोचे अध्यक्ष मा.श्री. नकुल पाटील यांचे हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी **श्री. जी.एस. गिल्ल**, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, **श्री. दीपक कपूर**, सहव्यवस्थापकीय संचालक, **श्री. अनंत शिपूरकर** (व्यवस्थापक पणन-१), **श्री. आर.ए. खानविलकर** (वरीष्ठ लेखाधिकारी), **श्री. मोहन निनावे** (जनसंपर्क अधिकारी), **श्रीमती देवी बाळ** (पणन अधिकारी) व **श्री. एस.एच. भावले** (लेखा अधिकारी) यांचा सन्मान करण्यात आला. तद्नंतर या प्रक्रियेच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता परिश्रम घेणाऱ्या पणन, लेखा, सॅप, अर्थ विभाग, संगणक विभाग, नियोजन व वास्तूशास्त्र विभाग, सुरक्षा विभाग या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला. त्यांच्या सन्मानप्रित्यर्थ दि. २७ मे, २००८ रोजी सिडको भवन येथे एका गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सिडकोचे अध्यक्ष मा.श्री. नकुल पाटील, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. जी.एस. गिल्ल व सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. यावेळी सिडकोचे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख





मान्यवरांनी पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव केला.

यावेळी बोलताना सिडकोचे अध्यक्ष **श्री. नकुल पाटील** म्हणाले की, बुक-बिल्डींग या अत्याधुनिक संकल्पनेचा वापर करुन प्रत्यक्ष लोकांचा सहभाग घेऊन अंमलात आणलेली ही



अभिनव गृहयोजना सिडकोच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेने पणन क्षेत्रात नवीन पायंडा घातला आहे. ही योजना यशस्वी करण्यासाठी संबंधीत विभागाने जे संयुक्त परीश्रम घेतले ते अगदी कौतुकास्पद आहे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी.एस. गिल्ल** आपल्या भाषणात म्हणाले की, भारतात बुक-बिल्डींग प्रक्रिया प्रथमच राबविण्याचा मान सिडकोकडे आला आहे. ही गृहनिर्माण योजना यशस्वी करण्यात पणन विभाग, जनसंपर्क विभाग, लेखा विभाग, अर्थशास्त्रज्ञ व नियोजन विभाग, प्रणाली विभाग आणि सुरक्षा विभाग यांचा खुप मोलाचा वाटा आहे. अत्याधुनिक संकल्पनांचा अवलंब या गृहनिर्माण योजनेत पारदर्शकता आणण्यात यशस्वी ठरला आहे, यात शंका नाही.



सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दीपक कपूर** आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, ही योजना म्हणजे सिडकोच्या कार्यप्रणालीत आणि अंमलबजावणीत एक अत्याधुनिक संकल्पना राबविण्याचा अनोखा प्रयत्न आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. आपल्या कार्याचे वेगळेपण सिद्ध करण्याची सिडकोची जिज्ञासा याद्वारे जनतेपुढे आली आहे. अशा पारदर्शक आणि लोकाभिमुख योजनांमुळे अग्रेसर राहण्याचा सिडकोचा प्रयत्न आता अधिक दृढ होत आहे, यात दुमत नाही.

श्री. पी.के. सिंह (सहा. पणन अधिकारी), श्रीमती नेहा करमरकर (पी.ए.-एम.एम.-१), श्री. एन.सी. घरत (सहा. पणन अधिकारी), श्री. बी.डी. कंकड (सहा. पणन अधिकारी), श्री. आर. आर. चित्ते (सहा. लेखा अधिकारी), श्री. एस.एस. ऐलानी (सॅप सदस्य), श्री. तुषार वैद्य (सहा. वास्तूतज्ञ), श्री. विनायक टकले (क्षेत्राधिकारी), श्री. एल.व्ही. मयेकर (आरेखक), श्री. सुर्यकांत राठोड (क्षेत्राधिकारी), श्री. व्ही.एस. खरे (क्षेत्र अधिकारी), श्री. किशोर पाटील (क्षेत्र अधिकारी), श्री. बी.के. मुल्ला (सहा. सुरक्षा अधिकारी), श्रीमती एम.एम. घरत (कार्यालयीन सहाय्यक), श्री. व्ही.पी. जोशी (कार्यालयीन सहाय्यक), श्री. अजय मौलीकर (प्रोग्रामर), श्री. अनंत पै (कम्प्युटर ऑपरेटर), श्रीमती नम्रता शेटचे (लघुलेखक), श्रीमती माया ठाकूर (स्वागतिका), श्री. महेंद्र म्हात्रे (लिपिक-टंकलेखक), श्री. तारीश राजोडीया (लिपिक-टंकलेखक), श्रीमती राजश्री पाटील (लिपिक-टंकलेखक), श्री. डी.एस. तांडेल (लेखा लिपिक), श्री. रविराज जोशी (लेखा लिपिक), श्रीमती एस.पी. भीरांगी (लेखा लिपिक), श्रीमती एम.एन. लाड (लेखा लिपिक), श्री. सोमनाथ पाटील (शिपाई) आणि श्री. मनोज फडकर (शिपाई) यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी श्री. मोहन निनावे यांनी केले.















# उल्लेख
# कामि
# कौतुक







# खनीय
# गिरीचा
# सोहळा











# Corporate Branding


















'T20-ELECTRIFYING NEW CRICKET - NAVI MUMBAI - PULSATING NEW CITY', claimed a hoarding perched high on the Jui Nagar bridge on the Sion Panvel Highway. This was part of the advertising campaign created by the Corporation to match with the cricket fever of the people who thronged the Dr. D. Y. Patil Sports Stadium in Navi Mumabi, to watch the IPL T20 cricket grand finale.

Sensing the great opportunity offered by the T20 Cricket Final VC & MD Shri. G. S. Gill and JMD Shri. Deepak Kapoor acted swiftly to create a positive aura for the Corporation and tell the world that CIDCO created the vibrating new city of NAVI MUMBAI.

Various possible media for communication was explored and a series of hoardings, gas filled neon balloon and advertising on Local trains was finalized. The campaign highlighted NAVI MUMBAI as a vibrant new city, offering modern lifestyle, smooth and classy drive along the express way and the forthcoming International Airport. Besides various direction boards were placed along the road from Vashi guiding spectators to the event.






# सिडकोच्या 'वास्तुविहार' व 'सेलिब्रेशन' गृहयोजनेच्या नोंदणीस उत्तम प्रतिसाद

सिडकोने नुकताच खारघर येथे 'वास्तुविहार' व 'सेलिब्रेशन' या २१४४ घरांच्या भव्य गृहप्रकल्पास प्रारंभ केला. या योजनेच्या नोंदणीकरीता दि. २७ मार्च, २००८ पासून माहिती पुस्तिकांच्या विक्रीस सुरुवात झाली. हे अर्ज सादर करण्यासाठी दि. १० एप्रिल ते दि. २ मे, २००८ पर्यंत कालावधी देण्यात आला होता. या अंतर्गत केएच-१ प्रकारातील सदनिकांसाठी ९४९०, केएच-२ साठी १०५५०, केएच-३ साठी ७०२६ व केएच-४ साठी ३३०६ अर्ज सादर झाले.

'वास्तुविहार' व 'सेलिब्रेशन' या गृहप्रकल्पांच्या योजना माहिती पुस्तिका विक्रीला जनतेचा भरघोस प्रतिसाद लाभला. या योजनेअंतर्गत अर्ज सादर करण्याकरीता तीन आठवडे इतका मुबलक कालावधी देण्यात आला. अर्ज स्वीकृतीची व्यवस्था बेलापूर येथील रायगड भवन कार्यालयात करण्यात आली होती. अर्ज सादर करताना जनतेला सहाय्य व्हावे यासाठी अर्ज स्वीकृती केंद्रावर सुविधाजनक व्यवस्था करण्यात आली होती. त्यासाठी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. जी.एस. गिल्ल व सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन व त्यांना मार्गदर्शक सूचनाही दिल्या. तसेच प्रत्यक्ष अर्ज स्वीकृती प्रक्रियेकाळात प्रत्येक घटनांवर जातीने लक्ष दिले.

अर्ज स्वीकृती प्रक्रिया जलद गतीने व्हावी यासाठी केंद्रावर प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन त्यांना योजना प्रक्रियाबाबत संपूर्ण माहिती व तांत्रिक ज्ञान ही देण्यात आले.

देखण्या निसर्गाच्या कुशीत
वास्तुविहार
खारघर
केएच-१ । केएच-२

नागरीकांच्या सुविधेसाठी अर्ज स्वीकृती केंद्रावर प्रत्येक सदनिकेच्या प्रकारानुसार वेगवेगळे काऊंटर ठेवण्यात आले होते. अर्ज सादर करण्यापूर्वी प्रत्येक अर्जदाराचे अर्ज नीट तपासून त्यासंबंधी मार्गदर्शक सूचनाही दिल्या जात होत्या. तसेच केंद्रांवर पाण्याची व्यवस्था, सुरक्षेकरीता योग्य बंदोबस्त पुरविण्यात आला.

ही अर्ज स्वीकृती योजना सुरळीत पद्धतीने पार पाडण्यासाठी व्यवस्थापक पणन-२ श्री. डी.एल.एन. मूर्ती व त्यांचे इतर सहकारी यांनी अथक परीश्रम घेतले. तसेच वरीष्ठ लेखा अधिकारी श्री. आर.ए. खानविलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी अर्ज स्विकृती प्रक्रिया नियोजनबद्ध व यशस्वीरित्या पार पाडली.

अनुभवा सुखी जीवनाचे क्षण
सेलिब्रेशन
केएच-३ । केएच-४

या योजनेतील सदनिकांचे वाटप संगणकीय सोडत पद्धतीने करण्यात येणार आहे. ही अर्ज स्वीकृती प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नागरीकांचेही भरघोस सहकार्य लाभले.









## कोकण व्हिजन महोत्सव व प्रदर्शनात सिडकोचा सहभाग






कोकण भूमी प्रतिष्ठानतर्फे दिनांक १० मे ते १९ मे, २००८ या कालावधीत एलफिस्टन रोड, कामगार क्रीडा मैदान, मुंबई येथे कोकण व्हिजन महोत्सव व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये सिडकोच्या विविध प्रकल्पांबद्दल माहिती देणारे दालन मांडण्यात आले होते. यात सिडकोचा उद्देश, नवी मुंबईतील गृहनिर्माण प्रकल्प, पायाभूत सोयी-सुविधा, रेल्वे प्रकल्प, रस्ते, माहिती व तंत्रज्ञान केंद्र, खारघर नगराविषयीची माहिती, उद्याने, हरितीकरण, सेंट्रल पार्क, पुनर्वसन, सामाजिक व सांस्कृतिक सुविधा तसेच प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ, विशेष आर्थिक क्षेत्र आदी विषयांबाबतची माहिती देणारे फलक लावण्यात आले होते. या प्रदर्शनातील सिडकोच्या दालनाला मा.ना.श्री.नारायण राणे (महसुल मंत्री) व मा.ना.श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री व रायगड जिल्हयाचे पालकमंत्री) यांनी भेट दिली. नागरिकांनी सिडकोच्या दालनाला भेटी देवून सिडकोच्या विविध प्रकल्पांविषयी माहिती जाणून घेतली आणि सिडकोच्या उपक्रमांची व कार्याची प्रशंसा केली. या दालनाच्या उभारणी व व्यवस्थापनाकरिता श्री.मोहन निनावे (जनसंपर्क अधिकारी), श्री.अनंतसिंह राजपूत (उच्चश्रेणी लघुलेखक) व श्री.मनोहर कोळी (कार्यालयीन सहायक) यांनी परिश्रम घेतले.






## द्रोणागिरी सिडको कार्यालयात अग्निशमन केंद्राचे उद्‌घाटन

नागरीकांची गरज व सुविधा लक्षात घेऊन सिडकोतर्फे द्रोणागिरी सेक्टर-१४, येथील सिडको नोडल कार्यालयात दि. ७ मे, २००८ पासून एक अद्ययावत असे अग्निशमन सेवा केंद्र सुरु करण्यात आले आहे.

द्रोणागिरी-उरणच्या आसपासच्या गावांमधील नागरीकांना आपत्ती काळात त्वरीत सेवा उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून हे सुसज्ज असे अग्निशमन केंद्र सुरु करण्यात आले आहे. या अग्निशमन केंद्रात फायर प्रणेता, ड्रायव्हर-ऑपरेटर, पाच फायर मॅन अशा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची निवासी सुविधा द्रोणागिरी गेस्ट हाऊस येथे करण्यात आली आहे. हे केंद्र फायर टेंडर तसेच इतर अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज आहे. सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी हे अग्निशमन केंद्र कार्यान्वित करण्याकरीता मार्गदर्शन केले व तत्संबंधी आदेश निर्गमित केले.

या अग्निशमन केंद्राच्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी २७२२२१३८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# सिडको माझी माय



अखेरचा हा तुला दंडवत
सिडको माझी माय ।।धृ।।

तुझ्या शिवारी पडता पाऊल
प्रगतीची मज लागली चाहूल
चारी दिशा ही आल्या जवळ
तू तर दूधावरची साय ।।१।।

तुने कुडाच्या भिंती सजविल्या
छतामधुनी ऊन ही थांबला
रिती टोपली भाकरी भरली
आणखी ऊणे काय? ।।२।।

तुझ्या अंगणी सवंगड्यासवे भांडलो
रागाच्या अश्वावर आरुढ झालो
सगळा वाद हा भातुकलीचा
त्याचा करतो कुणी का न्याय? ।।३।।

सहकाऱ्यांनी प्रेम मज दिले
सगळे मी ते कणगीत भरले
उरल्या आयुः मी ते पुरवीण
त्यापुढे माणिक मोती काय? ।।४।।

कुणी सवंगडी असे भेटले
दिपस्तंभ त्यांनी मला मानिले
नांव त्यांची किनारी लागता
फुटले पंख आणि पाय ।।५।।

तिन्ही रुपे मी तुला पाहिली
उदय मध्य उतरती सावली
तिन दशके तु मला घेतले पदरी
उदरी पुन्हा जन्म घेऊ काय?।।६।।

असंख्य घरटी तुने बांधली
तू तर त्यांच्या हृदयी वसली
निंदकाची धार बोथड झाली
तू तर मायेही ही माय ।।७।।

अशीच व्हावी तुझी उन्नती
नाव कोरावे क्षितिजा वरती
देशसेवेचे तू बांधिले घुंघरु
तुझे थिरकत राहावे पाय ।।८।।

अखेरचा हा तुला दंडवत
सिडको माझी माय ।।

**शिवदास पाटील**

## निकीता साळुंकेची सोनेरी कामगिरी



औरंगाबाद जिल्हा रायफल संघटनेची नेमबाज व सिडकोचे प्रशासक (औरंगाबाद) श्री. वसंत साळुंके यांची कन्या निकीता वसंतराव साळुंके हिने राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत तीन सुवर्णपदके मिळवून विक्रम केला आहे. नाशिक येथील राज्यस्तरीय स्पर्धेपाठोपाठ मुंबईची रेंज गाजवणाऱ्या निकीताने एका आठवड्यात सलग तीन सुवर्णपदके पटकावली.

स्टेपींग स्टोन स्कुलच्या या विद्यार्थिनीने राज्यस्तरीय आंतरशालेय नेमबाजी स्पर्धेत सोनेरी कामगिरी केली. त्यानंतर मुंबई येथे आयोजित बारावी कॅप्टन एझिकल स्मृती नेमबाजी स्पर्धाही गाजवली. तिने ओपन साईट एअर रायफलच्या (महिला) सिनीअर व सब ज्युनिअर अशा दोन गटांत सुवर्णपदके पटकावली. एका आठवड्यात सलग तीन सुवर्णपदके पटकावणाऱ्या निकीताच्या या यशामुळे २००८ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय जी. व्ही. मावळणकर स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

या यशाबद्दल रायफल संघटनेचे अध्यक्ष पोलिस आयुक्त श्री. के.एल. बिष्णोई, सचिव श्री. राहूल पटवर्धन, उपाध्यक्ष श्री. पी.व्ही. कुलकर्णी, एम.जी.एम.चे विश्वस्त श्री. अंकुशराव कदम, श्री. विश्वास उकीर्डे तसेच सिडको कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तिचे कौतुक केले.

## अभिनंदन : पदोन्नती व नियुक्ती

सिडको महामंडळात मे, २००८ मध्ये पुढील कर्मचारी / अधिकाऱ्यांची पदोन्नती / नियुक्ती करण्यात आली आहे.

**पदोन्नतीः**

**श्री. मोहन बी. निनावे**, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी यांना जनसंपर्क अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे.

**नियुक्तीः**

**श्रीमती लक्ष्मी जे. मेनन** यांची सहाय्यक परीवहन अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्व पदोन्नती / नवनियुक्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

## भावपूर्ण श्रद्धांजली



सिडको महामंडळामध्ये सुरक्षा विभागात काम करणारे सुरक्षा रक्षक **पांडुरंग विष्णू शिंदे** यांचे रविवार, दिनांक ११ मे, २००८ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनानिमित्त सिडको भवनात एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रसंगी सिडको कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# निरोप समारंभ


श्री. अरविंद रामचंद्र जाधव


श्री. बाबुराव ग. वडजे


श्री. सुर्यकांत का. देशमुख


श्री. अनंत रामा म्हात्रे


श्री. भरत हरिभाऊ म्हसकर


श्री. मधूकर कान्हा ठाकूर


श्री. पांडूरंग न. मढवी


श्री. मधुकर ना. पाटील


श्री. अनंत गजानन पाटील


श्री. निवृत्ती सखाहरी बडदे


श्री. अनंत धर्मा भोईर


श्री. भालचंद्र पं. कोलपकर


श्री. अनंत तुकाराम पाटील


श्री. दशरथ सिताराम कोळी


श्री. वसंत हरी पाटील


श्री. कृष्णा म्हसू सोनावणे


श्री. यशवंत बा. घरत


श्री. कुडलिक भा. हेळकर


श्री. केशरीनाथ ह. पाटील


श्री. महादेव सो. कोळी

**श्री. अरविंद रामचंद्र जाधव** (व्यवस्थापक कार्मिक), **श्री. बाबुराव ग. वडजे** (अधिक्षक अभियंता), **श्री. सुर्यकांत का. देशमुख** (पणन अधिकारी), **सौ. देवी मधूकर बाळ** (पणन अधिकारी), **श्री. अनंत रामा म्हात्रे** (वरिष्ठ पंप चालक), **श्री. भरत हरिभाऊ म्हसकर** (उच्चश्रेणी लघुलेखक), **श्री. मधूकर कान्हा ठाकूर** (लेखापाल), **श्री. पांडूरंग न. मढवी** (तांत्रिक सहाय्यक-१), **श्री. मधुकर ना. पाटील** (तांत्रिक सहाय्यक-२), **श्री. अनंत गजानन पाटील** (तांत्रिक सहाय्यक-१), **श्री. निवृत्ती सखाहरी बडदे** (तांत्रिक सहाय्यक-२), **श्री. अनंत धर्मा भोईर** (शिपाई), **श्री. भालचंद्र पं. कोलपकर** (सहाय्यक अभियंता), **श्री. शिवदास शां. पाटील** (कार्यालयीन सहाय्यक), **श्री. अनंत तुकाराम पाटील** (तांत्रिक सहाय्यक), **श्री. दशरथ सिताराम कोळी** (लेखापाल), **श्री. वसंत हरी पाटील** (सुरक्षा सहाय्यक ), **श्री. कृष्णा म्हसू सोनावणे** (फिटर), **श्री. यशवंत बा. घरत** (सुरक्षा रक्षक), **श्री. कुडलिक भा. हेळकर** (सफाई कामगार), **श्री. केशरीनाथ ह. पाटील** (माळी) व **श्री. महादेव सो. कोळी** (दप्तरी) हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३१ मे, २००८ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी व इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन व सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



संपादक, मुद्रक व प्रकाशक: मोहन निनावे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी).
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.